परिपत्रक नं. ३३

रयत शिक्षण संस्था,सातारा.
कायदा विभाग
दि. १२-९-२०१७

सर्वश्री शाखाप्रमुख,
रयत शिक्षण संस्था

यांना ----

विषय - जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी नियुक्तीबाबत.

संदर्भ - आमचेकडील परिपत्रक नं. १३ दि. १३-६-२०१४ चे परिपत्रक.

केंद्रीय माहितीचा अधिकार २००५ नुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये (सर्व अनुदानित शाखा) जनमाहिती अधिकारी व त्यापेक्षा वरिष्ठ दर्जाचा अधिकारी हा प्रथम अपिलीय अधिकारी असणे आवश्यक आहे. सबब आमचेकडील वरील परिपत्रकामधील जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या नियुक्तीबाबत बदल केलेला असून जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी खालीलप्रमाणे राहतील.

१. प्राथमिक विद्यालय, माध्यमिक विद्यालय, उच्च माध्यमिक विद्यालय, आश्रमशाळा, अध्यापक विद्यालय विद्यालयासाठी संबंधित विद्यालयाचे पर्यवेक्षक / उपमुख्याध्यापक अथवा सेवाजेष्ठ शिक्षक हे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून मुख्याध्यापक हे काम पाहतील.
२. महाविद्यालयासाठी संबंधित महाविद्यालयाचे प्रबंधक / अधिक्षक हे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून प्राचार्य हे काम पाहतील.
३. संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालयात सहसचिव (उच्च शिक्षण) हे जनमाहिती अधिकारी व मा. सचिव हे प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून काम पाहतील.
४. संस्थेच्या विभागीय कार्यालयात सहाय्यक इन्स्पेक्टर हे जनमाहिती अधिकारी व इन्स्पेक्टर हे प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून काम पाहतील.
५. ऑडिट कार्यालयासाठी ऑडिट विभाग प्रमुख हे जनमाहिती अधिकारी व ऑडिटर हे प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून काम पाहतील.
६. वसतिगृहे व इतर शाखांसाठी त्या त्या शाखेचे प्रमुख हे प्रथम अपिलीय अधिकारी व त्यापेक्षा कनिष्ठ दर्जाचा अधिकारी हे जन माहिती अधिकारी म्हणून काम पाहतील.

तरी वरीलप्रमाणे प्रत्येक शाखेने आपल्या कार्यालयात जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका करून तसा फलक तयार करून तो दर्शनी भागात लावावा. तसेच माहितीचा अधिकार कलम ४ (१) (क) नुसार सर्व शाखांनी त्यांचेकडील अभिलेख तालिकाबध्द व सुचिबध्द करावेत व कलम ४ (१) (ख) नुसार १७ बार्बीवरील माहिती तयार करून ती दरवर्षी अद्ययावत करावी. सोबत माहिती अधिकार संदर्भातील परिपत्रके व शासन आदेश जोडलेले आहेत.

सचिव
रयत शिक्षण संस्था,सातारा.

प्रत माहितीसाठी रवाना. . .

१) सहसचिव (माध्य / उच्च शिक्षण), रयत शिक्षण संस्था,सातारा.
२) सर्व विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था, सातारा.
३) ऑडिटर, रयत शिक्षण संस्था,सातारा.
४) को-ऑर्डिनेटर, रयत शिक्षण संस्था,सातारा.

परिपत्रक नं. १३

रयत शिक्षण संस्था,सातारा.
कायदा विभाग
दि.१३-६-२०१४

सर्वश्री शाखाप्रमुख,
रयत शिक्षण संस्था

यांना ----

विषय - माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी नियुक्तीबाबत.

संदर्भ - आमचेकडील जा. नं. कई / १४२० दि. ५-५-२००६ चे परिपत्रक.

भारत सरकारने केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये, माहिती देण्यासाठी माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी नियुक्तीबाबत दि. १२ आक्टोबर २००५ रोजी कायदा अस्तित्वात आणला असून, त्यामधील भाग (सेक्शन) ५ नुसार, तसेच मॅनेजिंग कौन्सिलच्या मान्यतेनुसार, संस्थेची महाविद्यालये, माध्यमिक विद्यालये, व उच्च माध्यमिक विद्यालये, प्राथमिक विद्यालये, आश्रमशाळा, वसतिगृहे व तदअनुषंगिक इतर शाखांसाठी खालील पदाधिकारी, माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी म्हणून काम पाहतील असें वरील संदर्भीय परिपत्रकाने कळविले होते.

सदर परिपत्रकामधील माहिती अधिकारी यांच्या नियुक्तीबाबत बदल केलेला असून माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी खालीलप्रमाणे राहतील.

१. वरिष्ठ महाविद्यालयासाठी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य हे माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी म्हणून सहसचिव (उच्च शिक्षण) हे काम पाहतील.
२. माध्यमिक विद्यालयाशी संलग्नित असणा-या कनिष्ठ महाविद्यालये / एम.सी.व्ही.सी व वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्नित असणारी कनिष्ठ महाविद्यालये / एम.सी.व्ही.सी यासाठी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाचे / एम.सी.व्ही.सी. चे मुख्याध्यापक / प्राचार्य हे माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी म्हणून सहसचिव (उच्च शिक्षण) हे काम पाहतील.
३. आश्रमशाळांसाठी संबंधित आश्रमशाळेचे मुख्याध्यापक हे माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी म्हणून सहसचिव (उच्च शिक्षण) हे काम पाहतील.
४. आय.टी.आय. संलग्नित असणारी माध्यमिक विद्यालयासाठी संबंधित आय.टी.आय. चे प्राचार्य हे माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी म्हणून सहसचिव (उच्च शिक्षण) हे काम पाहतील.
५. पूर्व प्राथमिक / प्राथमिक / माध्यमिक विद्यालयांसाठी संबंधित विद्यालयाचे मुख्याध्यापक हे माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी म्हणून सहसचिव (माध्यमिक ) हे काम पाहतील.
६. संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालयात सहसचिव (उच्च शिक्षण) हे माहिती अधिकारी व मा. सचिव हे अपिलीय अधिकारी म्हणून काम पाहतील.
७. संस्थेच्या विभागीय कार्यालयात इन्स्पेक्टर हे माहिती अधिकारी व मा. सचिव हे अपिलीय अधिकारी म्हणून काम पाहतील.
८. ऑडिट कार्यालयासाठी ऑडिटर हे माहिती अधिकारी व मा. सचिव हे अपिलीय अधिकारी म्हणून काम पाहतील.
९. वसतिगृहे व इतर शाखांसाठी त्या त्या शाखेचे प्रमुख हे माहिती अधिकारी व सहसचिव (माध्यमिक) हे अपिलीय अधिकारी म्हणून काम पाहतील.
१०. अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य हे माहिती अधिकारी व सहसचिव (माध्यमिक) हे अपिलीय अधिकारी म्हणून काम पाहतील.

सचिव
रयत शिक्षण संस्था,सातारा.

टीप - वरील परिपत्रक वाचून पाहिल्यानंतर परिपत्रकात नमूद असलेले माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या नावचा बोर्ड तयार करून तो सर्वांना दिसेल अशा ठिकाणी लावावा.

प्रत माहितीसाठी रवाना. . .

१) सहसचिव (माध्य / उच्च शिक्षण), रयत शिक्षण संस्था,सातारा.
२) सर्व विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था, सातारा.
३) ऑडिटर, रयत शिक्षण संस्था,सातारा.
४) को-ऑर्डिनेटर, रयत शिक्षण संस्था,सातारा.

परिपत्रक क्र.७

रयत शिक्षण संस्था, सातारा.
कायदा विभाग
ता. १६-६-२००८

सर्वश्री. शाखाप्रमुख,
रयत शिक्षण संस्था, सातारा.

यांना :-

विषय :- **माहितीचा अधिकार २००५ बाबत.**
संदर्भ :- राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ यांचेकडील ता. १८/३/२००८चे सुचनापत्र.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती देताना खालील गोष्टींचा काटेकोरपणे पालन करावे.

**१. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये एखादयाने माहिती मागविली असेल तर माहिती मागणीचा अर्ज प्राप्त झाले पासून जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसांत माहिती देणे बंधनकारक आहे. सदरचा अर्ज आपल्याशी संबंधीत नसल्यास संबंधीत विभागाकडे तो पाठविल्यास पांच दिवसांची अतिरिक्त मुदत कायदयाने दिलेली आहे. या दोन्हीबाबींचे जन माहिती अधिका-यांनी याचे काटेकोरपणे पालन केलेच पाहिजे.**

**२ सदरची माहिती ही ३० दिवसांच्या आंत पाठविली नाही तर वापुढील कालावधीसाठी होणा-या कारवाईस/ दंडाच्या रक्कमेस संबंधीत जबाबदार राहतील यांची नोंद घ्यावी.**

परिपत्रक

**३. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये एखाद्याने माहिती मागविली असेल ती माहिती देताना माहितीच्या संदर्भातील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.**

**४. राज्य माहिती आयोग यांचेकडे जर अपील दाखल झाले असेल तर त्या माहिती आयोगाच्या सुनावणीस माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांनीच सर्व कागदपत्रासह उपस्थित राहून माहिती दयावयाची आहे.**

**५. केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ या कायदयाचे प्रत्येकाने अवलोकन करावे व मार्गदर्शनासाठी शासनाकडून वेळोवेळी निघणा-या परिपत्रकांचा अवलंब करावा.**

सचिव,
रयत शिक्षण संस्था, सातारा.

प्रत माहितीसाठी रवाना :-
१.श्री. सहसचिव (माध्य/ उच्च शिक्षण ) रयत शिक्षण संस्था, सातारा.
२. ऑडिटर, रयत शिक्षण संस्था, सातारा.